Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XI ISSUE- V MAY 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# लातूर जिल्ह्याच्या विकासात साखर कारखानदारीचे योगदान

**प्रा.डॉ. प्रमोद लक्ष्मणराव चव्हाण**
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर.

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये उद्योग क्षेत्राला अतिशय महत्त्वाचे स्थान असते. विकासाची उच्च पातळी गाठण्यासाठी उद्योग क्षेत्राच्या वाढीची व विस्ताराची आवश्यकता असते. म्हणजेच अल्प विकसित व विकसनशील अर्थव्यवस्थांच्या विकासामध्ये उद्योग क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असते. महाराष्ट्र हे भारतातील औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले राज्य आहे. पुरोगामी विचाराचे कृतिशील राज्य म्हणून महाराष्ट्र अनेक क्षेत्रात अन्य राज्यांसाठी पथ दर्शक ठरले आहे. भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय पार्श्वभूमी सकस रूपात लाभलेल्या मराठवाड्यावर् निजामाचे सव्वा दोनशे वर्ष राज्य होते. मराठवाड्यातील जनतेच्या मागासपणाचे व गुलामी वृत्तीचे कारण सांगताना निजाम राजवटीचे कारण सांगितले जायचे . याच मराठवाड्यातील लातूर हा एक प्रमुख जिल्हा मानला जातो. लातूर जिल्ह्याचा विचार करता आजचा लातूर जिल्हा हा पूर्वी निजाम राजवटीखाली असल्याने स्वातंत्र्यपूर्व काळात सरकारतर्फे औद्योगिक विकासाचे प्रयत्न झाले नाहीत. लोकमान्य टिळक व स्थानिक उद्योजक, व्यापाऱ्यांनी लातूर येथे जिनिंग व् तेल उद्योगाला चालना दिली. लातूर जिल्ह्याची प्रगती होत असताना या भागात येथील राज्यकर्त्यांनी सहकारी चळवळीच्या माध्यमातून अनेक उद्योग उभे केले. लातूर जिल्ह्यात सहकारी तत्त्वावर सूतगिरणी, ऑइल मिल, कृषी उत्पन्न बाजार पेठ, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, विविध सहकारी बँकासह सहकारी तत्त्वावर साखर कारखान्यांची स्थापना करून या क्षेत्राचा कायापालट केला

लातूर जिल्ह्यात कृषी उत्पादनावर आधारित जे उद्योग आहेत त्यात सर्वाधिक गुंतवणूक असणारा उद्योग हा साखर उद्योग आहे. तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यात उसाचे क्षेत्र वाढत गेल्याने सन १९६५ ला मराठवाड्यातील पहिला तेरणा सहकारी साखर कारखाना सुरू करण्याच्या कामी केशवराव सोनवणे यांनी पुढाकार घेतलेला दिसून येतो.(१) त्यानंतर औसा तालुक्यातील किल्लारी येथे शेतकरी सहकारी साखर कारखाना सन 1979 ला सुरू झाला. मात्र त्याचे प्रत्यक्ष उत्पादन 1972-73 ला सुरू झाले.(२) सन 1974 ला औसा तालुक्यातील हलगरा येथे हनुमान खांडसरी शुगर मिल्स हा खाजगी खांडसरी साखर कारखाना स्थापित झाला. त्यानंतर सन 1980 ला उदगीर व अहमदपूर येथे प्रत्येकी एक खांडसरी साखर उद्योग सुरू झाला. परंतु नंतर ते कारखाने बंद पडले. लातूर जिल्ह्याची स्थापना 16 गोष्ट 1982 ला झाली. त्यावेळी लातूर जिल्ह्यात तीन साखर कारखाने होते.(३) आज येथे 11 सहकारी साखर कारखाने उभे टाकले आहेत. लातूर जिल्ह्यातील कारखाने सहकारी तत्वावर चालत असून अतिशय उत्तम रित्या ते उत्पादनाचे नवनवीन विक्रम प्रस्थापित करीत आहेत. सन 1984 ला मा. आमदार विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने लातूर येथे मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना सुरू झाला. या कारखान्याने सन 2004 ते 2005 पर्यंत राष्ट्रीय व राज्य पातळीवरील 47 पुरस्कार प्राप्त केले आहेत.(४) सन 1989 ला अंबुलगा येथे माजी मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या पुढाकारातून शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना स्थापन झाला. तसेच नळेगाव येथील जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना, अहमदपूर तालुक्यात उजना येथील बालाघाट शेतकरी सहकारी साखर कारखाना, उदगीर तालुक्यात तोंडार या गावी प्रियदर्शनी शेतकरी साखर कारखाना, रेनापुर तालुक्यातील पानगाव येथे पानगेश्वर शुगर मिल्स, औसा तालुक्यात बेलकुंड येथे श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना, लातूर तालुक्यातील निवळी येथे विकास सहकारी साखर कारखाना, रेनापुर तालुक्यात रेना सहकारी साखर कारखाना इत्यादी साखर कारखाने 100% क्षमतेने

कार्यरत असून या कारखानदारीमुळे येथील उसाचे क्षेत्रफळ मोठ्या प्रमाणात वाढले आहे.(५) त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात भरपूर पैसा येऊ लागला. परिणामी जिल्ह्यातील लोकांचा जीवनस्तर सुधारण्यास फार मोठी मदत झाली. सर्व कारखान्यातील मिळून 74 हजार 366 शेतकरी या सहकारी साखर कारखान्याचे सभासद बनले आहेत.(६) सहकारी साखर कारखानदारीतून जिल्ह्यातील ग्रामीण भागात आर्थिक क्रांती येत असताना जिल्ह्याचे सुपुत्र आणि मांजरा सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक विलासराव देशमुख राज्याच्या मुख्यमंत्री पदावर विराजमान झाले आणि डबघाईला आलेल्या किल्लारी येथील सहकारी साखर कारखान्यास जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून मदत करून त्या कारखान्याचाही गळीत हंगाम सुरू केला. एकंदरीत साखर कारखानदारीमुळे जिल्ह्यात आर्थिक समृद्धी आली. सन 2006-07 या वर्षाच्या गळीत हंगामात जिल्ह्यातील साखर कारखान्यात एकूण 25 लाख टन उसाचे गाळप झाले होते. त्यातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या घरात जवळपास 250 कोटी रुपये गेले. एवढीच रक्कम मजूर, वाहतूकदार, कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या घरात गेली.(७) मागील पंचवीस वर्षाच्या काळात बदलत गेलेल्या अर्थकारणामुळे ग्रामीण भागातील झोपड्या जाऊन त्या ठिकाणी कॉंक्रीटची घरे उभी राहिली. बैलगाडीची जागा कार किंवा ट्रॅक्टर यांनी घेतली. घरात सुख सुविधा आल्या. त्यामुळे अनेक गावांचा चेहरा मोहरा बदलला आहे.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये जसे सहकार क्षेत्र यशस्वी ठरले अगदी तसेच लातूर जिल्ह्यातील सहकारी तत्त्वावर उभे टाकलेले साखर उद्योग यशस्वी ठरले. राष्ट्रीय निकषानुसार जो साखर कारखाना 180 दिवस उसाचे गाळप करू शकतो त्याने गाळपक्षतेच्या शंभर टक्के वापर केला असे मान. ले जाते मात्र भारतातील इतर घटक राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात साखर उता-याचे प्रमाण जास्त असल्याने महाराष्ट्रासाठी हा निकष 160 दिवस गाळपाचा मानण्यात येऊ लागला. (८)

उदात्त हेतू, जिद्द आणि अद्यावत तंत्रज्ञान घेऊन उभा टाकलेला मांजरा सहकारी साखर कारखाना हा मराठवाड्यात सहकारी साखर कारखानदारीत चालू शकत नाही हा जुन्या जाणत्या मंडळीचा समज खोटा ठरवणारा ठरला आहे. मराठवाड्यातील सहकारी साखर कारखानदारीची प्रयोगशाळा बनलेल्या मांजरा कारखान्याने दुप्पटच नव्हे तर अडीच पट कार्यक्षमतेने कारखाना चालविण्याचे जागतिक रेकॉर्ड तयार केले. मध्यम साखर उताराचा झोन म्हणून परिचित असलेल्या लातूर जिल्ह्यातील मांजरा कारखान्याने साखर उतारा 10% वरून 14% पर्यंत नेला. त्यामुळे सर्वांचे डोळे विसफारले गेले. मांजरा साखर कारखान्याने घडविलेली किमया पाहण्यासाठी मराठवाडा तसेच राज्यातील साखर तज्ञ येऊ लागले. त्याचे अनुकरण लातूर जिल्ह्यातील च नाही तर मराठवाडा व राज्यातील साखर कारखान्यात करण्यात येऊ येऊन त्यांच्यात् स्पर्धा निर्माण झाली.लातूर येथिल् शिक्षणाबरोबरच एक नवा सहकारी साखर कारखानदाराचा मांजरा पॅटर्न निर्माण झाला. लातूर जिल्हा साखर कारखानदारीमुळे ग्रामीण अर्थकारण बदलत असतानाच त्याचा, येथील औद्योगीकरणावरही सकारात्मक परिणाम झाला आहे. ग्रामीण भागातील दैनंदिन गरजा भागविण्यासाठी शहरातील बाजारपेठेत भली मोठी उलाढाल होत आहे. परंतु इतर तालुक्याच्या ठिकाणी लातूर तालुक्याप्रमाणे मोठ्या प्रमाणात उद्योग उभारले नाहीत. तरीही प्रत्यक्ष लातूर शहरात जुने आणि नव्या औद्योगिक क्षेत्रात अनेक उद्योग व्यवसाय उभे राहत आहेत. पूर्वी 263.26 हेक्टर औद्योगिक क्षेत्रात असलेल्या औद्योगिक क्षेत्रात नव्याने 1073.83 हेक्टर क्षेत्राची भर पडली आहे.(९) विलासरावजी देशमुख यांच्या प्रयत्नातून विकसित झालेल्या या क्षेत्रावर आता मोठे मोठे प्रकल्प सुरू झालेले आहेत. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे या सर्व उद्योगाचा पाया शेती हाच राहिला आहे.

**संदर्भग्रंथ सूची.**

1. पाठक अरुणचंद्र (संपा.) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, लातूर जिल्हा, भाग एक दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई 2008, पृष्ठ. 359
2. कित्ता. पृष्ठ. 359
3. दगडे जयप्रकाश (संपा.) स्मरणिका, लातूर जिल्हा रौप्य महोत्सवी समिती, लातूर 1982 ते 2007, पृष्ठ.30
4. पाठक अरुणचंद्र (संपा.) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, लातूर जिल्हा, भाग एक दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई 2008, पृष्ठ. 359
5. कित्ता. पृष्ठ. 360 ते 363

6. कित्ता. पृष्ठ. 444
7. दगडे जयप्रकाश (संपा.) स्मरणिका, लातूर जिल्हा रौप्य महोत्सवी समिती, लातूर 1982 ते 2007, पृष्ठ.30
8. पाठक अरुणचंद्र (संपा.) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, लातूर जिल्हा, भाग एक दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई 2008, पृष्ठ. 359
9. जाधव जयद्रथ, लातूर वसा आणि वारसा, अरुणा प्रकाशन, लातूर 2017, पृष्ठ. 800

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com